जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
3 1 OCT 2019
तरुण भारत

# व्यावसायिक क्षेत्रात फटाक्यांचा धमाका

## शांतता, रहिवासी क्षेत्रात आवाज कमी : शिवाजी विद्यापीठ पर्यावरणशास्त्र अधिविभागाचा अहवाल

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील पर्यावरणशास्त्र अधिविभागातर्फे दरवर्षी दिवाळीमध्ये फटाक्यांची ध्वनीपातळी (डेसिबल) मोजली जाते. यंदाच्या दिवाळीत शांतता आणि रहिवास क्षेत्रात फटाक्यांचा आवाज कमी झाला आहे. तर व्यावसायिक क्षेत्रात आवाजात वाढ झाल्याचा अहवाल पर्यावरणशास्त्र विभागाने दिला आहे.

शिवाजी विद्यापीठातील पर्यावरणशास्त्र अधिविभागातर्फे तपासलेल्या अहवालानुसार औद्योगिक क्षेत्राबरोबरच रहिवासी क्षेत्रात देखील ध्वनी प्रदुषणाची पातळी मोजली जाते.

दिपावलीमध्ये रहिवासी, व्यावसायिक, औद्योगिक व शांत (सायलेंट) क्षेत्रातील फटाक्यांची ध्वनी पातळी मोजली आहे. मानांकनाप्रमाणे औद्योगिक क्षेत्रात दिवसा ७५ व रात्री ७० डेसीबल, व्यावसायिक क्षेत्रात दिवसा ६५ व रात्री ५५, रहिवासी क्षेत्रात दिवसा ५५ व रात्री ४५ तसेच शांत क्षेत्रात दिवसा ५० व रात्री ४० डेसिबल असावे, असा नियम आहे. शिवाजी विद्यापीठाने मोजलेल्या ध्वनीपातळीत रहिवासी आणि शांतता क्षेत्रात आवाजात घट झाली असली तरी व्यावसायिक क्षेत्रात वाढ झाली असून ही पर्यावरणाच्या दृष्टीने चिंताजनक बाब आहे. पर्यावरणशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. पी. डी. राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक प्रा.डॉ. ए. एस. जाधव, डॉ. संदीप मांगलेकर, चेतन भोसले, निलेश शिंगाडे, सूरज पोवार, विनायक तुरंबे, शीतल पाटील यांनी ध्वनीप्रदूषणाची पातळी मोजली.



- गतवर्षीपेक्षा यंदाच्या दिवाळीत आवाज कमी
- लक्ष्मीपूजनादिवशी जास्तीत जास्त आवाज
- घरगुती क्षेत्रात आवाजाची पातळी कमी दिसून आली

**शिवाजी विद्यापीठातील पर्यावरणशास्त्र अधिविभागाने लक्ष्मीपूजनादिवशी घेतलेल्या डेसिबलचे प्रमाण**

| क्षेत्र | क्षेत्राचे नाव | २०१८ | २०१९ |
|---|---|---|---|
| शांतता क्षेत्र | सीपीआर | ६०.९० | ५२.७६ |
| | न्यायालय | ६२.६० | ५०.६३ |
| | जिल्हाधिकारी कार्यालय | ६१.६० | ५५.३५ |
| रहिवास | राजारामपुरी | ५४.५० | ५४.३१ |
| | उत्तरेश्वर पेठ | ६२.८० | ६१.६५ |
| | शिवाजी पेठ | ५८.९० | ५५.५६ |
| | ताराबाई पार्क | ५६.९० | ५४.७८ |
| | मंगळवार पेठ | ५४.७० | ५३.८५ |
| व्यावसायिक | राजारामपुरी | ६४.४० | ५८.५२ |
| | शाहूपुरी | ६२.३० | ५९.०३ |
| | लक्ष्मीपुरी | ६१.९० | ५८.३१ |
| | महाद्वार रोड | ६३.७० | ६०.३३ |
| | गुजरी कॉर्नर | ६३.४० | ६६.२७ |
| | पापाची तिकटी | ६२.४० | ६५.८४ |
| | बिनखांबी | ६०.३० | ६३.२१ |
| | मिरजकर तिकटी | ५७.८० | ५८.३८ |
| | गंगावेश | ६२.७० | ६०.४६ |
| | बिंदू चौक | ६१.५० | ६१.५७ |
| औद्योगिक क्षेत्र | उद्यमनगर | ५८.५० | ५९.६१ |
| | वाय.पी.पोवारनगर | ५६.७० | ५८.९९ |

लोकमत

## शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागाची पाहणी : रहिवासी क्षेत्रात फटाक्यांचा आवाज कमी

# यंदाच्या दिवाळीत ध्वनिप्रदूषणामध्ये मोठी घट

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** या वर्षीच्या दिवाळीत कोल्हापूर शहरांच्या विविध भागांमध्ये फटाक्यांचा आवाज कमी राहिल्याने ध्वनिप्रदूषण घटले आहे. दिवाळीच्या कालावधीत लक्ष्मीपूजनादिवशी सायंकाळी ६.३० ते रात्री ९.३० या वेळेत सर्वाधिक आवाजाची नोंद झाली. रहिवासी क्षेत्रात आवाजाची पातळी कमी झाली आहे, अशी माहिती शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. पी. डी. राऊत यांनी बुधवारी दिली.

विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागाने यावर्षी औद्योगिक, व्यावसायिक, रहिवासी आणि शांतता क्षेत्रनिहाय शहरातील २२ ठिकाणी रविवारी (दि. २७) ते मंगळवार (दि. २९) दरम्यान पाहणी केली. सायंकाळी सहा ते रात्री दहा या वेळेत ध्वनिप्रदूषणाच्या नोंदी घेतल्या. त्यामध्ये गेल्या वर्षीपेक्षा यंदाच्या दिवाळीत गुजरी कॉर्नर, पापाची तिकटी, बिनखांबी गणेश मंदिर, मिरजकर तिकटी, बिंदू चौक, शिवाजी उद्यमनगर आणि वाय. पी. पोवारनगर परिसर वगळता अन्य ठिकाणी फटाक्यांचा आवाज कमी राहिला. शांतता क्षेत्रातील आवाजाने मर्यादा ओलांडली. जास्तीत जास्त आवाज लक्ष्मीपूजनाच्या दिवशी झाल्याचे निदर्शनास आले. कोल्हापूरकरांमध्ये प्रदूषणाबाबत झालेली जागृती यामुळे फटाक्यांचा आवाज कमी झाला आहे. पर्यावरणशास्त्र अधिविभागातील साहाय्यक प्राध्यापक डॉ. ए. एस. जाधव, डॉ. संदीप मांगलेकर, संशोधक विद्यार्थी चेतन भोसले, एम. एस्सी. अभ्यासक्रमाचे विद्यार्थी नीलेश शिंगाडे, सूरज पोवार, विनायक तुरंबे, शीतल पाटील यांनी ध्वनिपातळी मोजण्याचे काम केले असल्याचे डॉ. राऊत यांनी सांगितले.

### गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा फटाक्यांचा आवाज (डेसिबलमध्ये)

| शहरातील ठिकाणे | २०१८ | २०१९ | शहरातील ठिकाणे | २०१८ | २०१९ |
|---|---|---|---|---|---|
| सीपीआर | ६०.९० | ५२.७६ | शाहूपुरी | ६२.३० | ५९.०३ |
| न्यायालय | ६२.६० | ५०.६३ | लक्ष्मीपुरी | ६१.९० | ५८.३१ |
| जिल्हाधिकारी कार्यालय | ६१.१० | ५५.३५ | महाद्वार रोड | ६३.७० | ६०.३३ |
| शिवाजी विद्यापीठ | ५४.३० | ५०.५४ | गुजरी कॉर्नर | ६३.४० | ६६.२७ |
| राजारामपुरी | ५४.५० | ५३.३१ | पापाची तिकटी | ६२.४० | ६५.८४ |
| उत्तरेश्वर पेठ | ६२.८० | ६१.६५ | बिनखांबी गणेश मंदिर | ६०.३० | ६३.२१ |
| ताराबाई पार्क | ५६.९० | ५४.७८ | मिरजकर तिकटी | ५७.८० | ५८.३८ |
| शिवाजी पेठ | ५८.९० | ५५.५६ | गंगावेश | ६२.७० | ६०.४० |
| नागाळा पार्क | ५५.९० | ५२.९६ | बिंदू चौक | ६१.५० | ६१.६७ |
| मंगळवार पेठ | ५४.७० | ५३.८५ | शिवाजी उद्यमनगर | ५८.५० | ५९.६१ |
| राजारामपुरी | ६४.४० | ५८.५२ | वाय. पी. पोवारनगर | ५६.७० | ५८.१९ |

◆ गुजरी कॉर्नर, पापाची तिकटी, बिनखांबी गणेश मंदिर, मिरजकर तिकटी, बिंदू चौक, शिवाजी उद्यमनगर आणि वाय. पी. पोवारनगर परिसर वगळता अन्य ठिकाणी फटाक्यांचा आवाज कमी



### मर्यादा अशा

| क्षेत्र | रात्री |
|---|---|
| औद्योगिक | ७० |
| व्यावसायिक | ५५ |
| रहिवासी | ४५ |
| शांतता | ४० |

## श्रद्धांजली

पाटील यांच्या नेतृत्वाने अनेक शिक्षणसंस्था उभारल्या. ग्रामीण भागातून शिक्षणाच्या ध्येयाने येणारा एक तरुण ते एका मोठ्या संस्थेचा आधारवड हा त्यांचा प्रवास प्रेरणादायी आहे. बुद्धिमत्तेच्या जोरावर त्यांनी केलेले काम अतुलनीय आहे. त्यांच्या जाण्याने शिक्षणक्षेत्रातील अनुभवाचे विद्यापीठ हरपले.

– डॉ. देवानंद शिंदे, कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

# कोल्हापूरकरांनी साजरी केली पर्यावरणपूरक दिवाळी

## फटाक्यांचे प्रमाण १० टक्क्यांनी कमी, लक्ष्मीपूजनाला उच्चांकी ६६.२७ डेसिबल आवाज

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

ध्वनिप्रदूषणाला आमंत्रण देणारे फटाके कमी वाजवून कोल्हापूरकरांनी यंदाची दिवाळी फटाकेमुक्त आणि पर्यावरणपूरक साजरी केली आहे. शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरण विज्ञान विभागाने केलेल्या निष्कर्षानुसार गतवर्षीच्या तुलनेत या वर्षी फटाके वाजवण्याचे प्रमाण १० टक्क्यांपर्यंत कमी आले असून, सर्वात जास्त ६६.२७ डेसिबल ध्वनीची नोंद लक्ष्मीपूजना दिवशी गुजरी येथे करण्यात आली आहे.

### शांतता क्षेत्रात आवाजामध्ये वाढ

शहरामध्ये फटाके कमी उडवल्यामुळे जिथे ध्वनिप्रदूषणाचे प्रमाण कमी झाले असताना अत्यंत महत्त्वाच्या शांतता क्षेत्रात मात्र आवाजाच्या नोंदी ५० डेसिबलच्या वर पोहोचलेल्या आहेत. शहरातील शिवाजी विद्यापीठ, सीपीआर, कोर्ट, जिल्हाधिकारी कार्यालय या ठिकाणी ५१ ते ५५ डेसिबलपर्यंत आवाज पोहोचला आहे.

दिवाळी सण हा प्रकाशाचा सण म्हणून ओळखला जातो. दिवाळी सणाला मोठ्या प्रमाणावर फटाक्यांची आतषबाजी केली जाते. दरवर्षी साधारण करोडो रुपयांचे फटाके शहरामध्ये विकले जातात. फटाक्यांमुळे होणारे ध्वनिप्रदूषण आणि पर्यावरणाची हानी लक्षात घेऊन पर्यावरणप्रेमी संस्था व व्यक्तींकडून फटाके फोडू नये, असे आवाहनही सर्वांना केले जाते. या आवाहनाला प्रतिसाद देत कोल्हापूरकरांनी या वर्षी फटाकेमुक्त दिवाळी साजरी करून राज्यामध्ये आदर्श निर्माण केला आहे. विद्यापीठाच्या पर्यावरण विज्ञान विभागाच्या विद्यार्थ्यांनी केलेल्या पाहणीनुसार या वर्षी फटाके फोडण्याचे प्रमाण गतवर्षीच्या तुलनेत १० टक्क्यांनी खाली आले असून, लक्ष्मीपूजनाचा रविवारचा दिवस वगळता सणाच्या इतर दिवशी फटाके अगदी नगण्य प्रमाणामध्ये वाजवण्यात आले. लक्ष्मीपूजन दिवशीही सायंकाळच्या वेळेत शहरातील महाद्वार रोड, गुजरी, राजारामपुरी अशा ठिकाणी ६५ डेसिबलपेक्षा जास्त आवाजाची नोंद झाली आहे. नागरी वस्तीचा परिसर असलेल्या शिवाजी पेठ, मंगळवार पेठ, ताराबाई पार्क आणि नागाळा पार्क अशा ठिकाणी ५८ डेसिबल आवाजाची नोंद झाली आहे. जी गेल्या वर्षी ६० डेसिबल पर्यंत पोहोचली होती. औद्योगिक वसाहत क्षेत्र असलेल्या उद्यमनगर, वाय. पी. पोवारनगर परिसरात मात्र या वर्षी २ डेसिबलची वाढ होऊन आवाज ६० डेसिबलपर्यंत पोहोचल्याची नोंद करण्यात आली आहे.

### व्यापारी पेठांमध्ये आवाज वाढला



गतवर्षीच्या तुलनेत नागरी वस्ती असलेल्या परिसरामध्ये ध्वनिप्रदूषणाचे प्रमाण घटले असले तरी व्यापारी परिसरामध्ये मात्र ध्वनिप्रदूषणाचे प्रमाण वाढत आहे. लक्ष्मीपूजनाचा दिवस वगळता बाकी अन्य दिवसांमध्ये फटाके फोडण्याचे प्रमाण अत्यल्प होते.

– **डॉ. पी. डी. राऊत,** विभागप्रमुख, पर्यावरण विज्ञान विभाग, शिवाजी विद्यापीठ

# शिवाजी विद्यापीठाच्या ‘वनस्पती शास्त्र’ची प्रयोगशाळा खुली

## सुगंधी तेलाची निर्मिती ; शेतकऱ्यांना होणार लाभ : तेलाच्या विक्रीसाठीही होणार प्रयत्न

**ओंकार धर्माधिकारी :**
सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ३० : जिरॅनियम वनस्पतीपासून तेल बनवण्याचे प्रशिक्षण शिवाजी विद्यापीठाच्या वनस्पतीशास्त्र विभागाकडून शेतकऱ्यांना आणि उत्पादकांना दिले जाते. मात्र, आपल्या शेती क्षेत्रात या तेल वनस्पती किती टन येतात? त्यातून किती किलो तेल निघेल? निघालेल्या तेलाचा दर्जा कसा आहे? त्याला बाजारपेठेत किती पैसे मिळतील? याचा अंदाज शेतकऱ्यांना नसतो. यासाठी शेतकऱ्यांना शेतात लावलेल्या तेल वनस्पतींपासून किती तेल निघते आणि त्याचा दर्जा काय? हे आता वनस्पती शास्त्र विभागाच्या इन्क्युबेशन अँड ट्रेनिंग सेंटरमध्ये त्यांना समजणार आहे. यासाठी आवश्यक असणाऱ्या चाचण्या माफक दरात त्यांना करून मिळतील. तसेच हे सुगंधी तेलाला बाजारपेठेत चांगला भाव मिळावा यासाठीही आता विभागाकडून प्रयत्न होणार आहेत.



> **जिरॅनियमपासून मिळणाऱ्या तेलाला मागणी अधिक आहे. मात्र, जमिनीचा प्रकार, त्यातून येणारे उत्पादन आणि त्यापासून निघणाऱ्या तेलाचा दर्जा या सर्व गोष्टींची माहिती घेऊनच शेतकऱ्यांनी हे उत्पादन घेतले पाहिजे. त्यामुळे त्यांना फायदा तर मिळेलच पण संभाव्य धोकेही टाळता येतील. या दृष्टीने वनस्पतीशास्त्र विभागाने अत्यल्प दरात शेतकऱ्यांना उपलब्ध केलेलेल्या चाचण्या उपयुक्त ठरणार आहेत. याचा लाभ शेतकऱ्यांनी घ्यावा.**
> – **डॉ. मानसिंहराज निंबाळकर,** सहायक प्राध्यापक, वनस्पतीशास्त्र विभाग

बाजारपेठेची मागणी आणि शेतामधील पीक यामध्ये समन्वय असेल तर शेतकऱ्यांना अधिक आर्थिक लाभ होईल, असे कृषी तज्ज्ञांकडून वारंवार सांगितले जाते. मात्र, अद्याप बहुसंख्य शेतकरी पारंपरिक पिके घेऊन शेती करतात. कारण त्यामधून त्यांना हमखास नफा मिळतो. अन्य पिके घेण्यास शेतकरी धजावत नाहीत, कारण त्यांना या पिकांची लागवड, त्यावरील प्रक्रिया, त्याची बाजारपेठ या गोष्टींची संपूर्ण माहिती नसते. यासाठीच शिवाजी विद्यापीठातील वनस्पती शास्त्र विभागाने एक अभिनव प्रयोग केला. त्यांनी जिरॅनियम वनस्पतीपासून तेल बनवण्याचे प्रशिक्षण काही शेतकऱ्यांना दिले. व त्यांना शेतामध्ये जिरॅनियम वनस्पतीचे तेल घेण्यासाठी प्रोत्साहीत केले. या तेलाचा वापर विविध प्रकारच्या अत्तरांमध्ये केला जाते. अत्तर बनवणाऱ्या कंपन्यांना या तेलाची आवश्यकता असते. जिरॅनियम पासून बनवलेल्या तेलाला मागणीही अधिक आहे. सर्व साधारणपणे एका एकरातून ७ ते ८ किलो तेल निघते. त्यानंतर त्यावर प्रक्रिया करून ते अत्तरात वापरले जाते.

तेलाची उपलब्धता, तेलाचा दर्जा यावरही त्याचा दर अवलंबून असतो. पण शेतकऱ्यांना याची कल्पना नसते. आपल्या शेती क्षेत्रातून किती तेल निघेल व त्याचा दर्जा कसा असेल याची खातरजमा केल्याशिवाय जिरॅनियमची शेती करणे धोक्याचे असते. हे ओळखून शिवाजी विद्यापीठाच्या वनस्पतीशास्त्र विभागाने शेतकऱ्यांना तेलाचा दर्जा तपासण्याच्या चाचण्या अत्यल्प किंमतीत उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला. रुसा अंतर्गत उभारण्यात आलेल्या इन्क्युबेशन अँड ट्रेनिंग सेंटरमध्ये या चचण्या करण्यात येतील. त्यातून शेतकऱ्यांना आपल्या जमिनीतून आलेल्या जिरॅनियममधून किती किलो तेल निघेल आणि त्याचा दर्जा कसा असेल याची माहिती मिळेल. त्याला किती दर मिळेल याची कल्पना आल्याने शेतकरी आपले आर्थिक ठोकताळे मांडू शकेल. या तेलाला बाजारपेठ मिळावी यासाठी विभागामार्फत प्रयत्न केले जाणार आहेत.